


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ११ • बुधवार दि.३० सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## निवडणूक आयोगाविरोधात इंडिया आघाडी आक्रमक

### ६ ऑक्टोबरला खासदारांचा मोर्चा;गल्ली ते दिल्ली आंदोलने



नवी दिल्ली:निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धती विरोधात आणि एसआयआर मोहिमेतील कथित गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर इंडिया आघाडीने देशव्यापी आंदोलनाची घोषणा केली आहे. येत्या महिनाभरात देशातील पाच प्रमुख शहरांमध्ये मोठे मोर्चे काढण्यात येणार असून, १ नोव्हेंबर रोजी राजधानी नवी दिल्लीत विराट मोर्चा काढला जाणार आहे. तसेच ६ ऑक्टोबर रोजी विरोधी पक्षांचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत, अशी माहिती काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली.

नवी दिल्ली येथे इंडिया आघाडीच्या प्रमुख नेत्यांची सुमारे साडेतीन तास बैठक झाली. या बैठकीत निवडणूक आयोगाची कार्यपद्धती, एसआयआर मोहीम आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता या मुद्द्यांवर चर्चा झाली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही विरोधकांनी केली. २ ते ८ ऑक्टोबर दरम्यान जिल्हास्तरावर आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ६ ऑक्टोबरला सर्व विरोधी पक्षांचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत विरोध मार्च काढणार आहेत. त्यानंतर विरोधी पक्षांचे नेते राष्ट्रपतींची भेट घेण्यासाठी वेळ मागणार असून, ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात भेट घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सोनिया गांधी, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी, जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला, तेजस्वी यादव, सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड, मेहबूबा मुफ्ती, डी. राजा, एम. ए. बेबी, दीपंकर भट्टाचार्य आदी नेते उपस्थित होते. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले. बैठकीनंतर खरगे यांनी निवडणूक आयोगावर टीका केली. भाजपने आधी नोटबंदी करून लुटले, आता व्होटबंदी करून लुटण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप त्यांनी केला. प्रत्येक निवडणूक बॅलेट **पान ४ वर**

## पावसाचा देशभरात परतीचा प्रवास

### ऑक्टोबर हिटची चाहूल;राज्यात १९ टक्के तर मराठवाड्यात तब्बल ३९ टक्के तूट

मुंबई/प्रतिनिधी-मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात होताच राज्यात आता ऑक्टोबर हिटची चाहूल लागली आहे. दिवसभर उन्हाचा चटका वाढत असतानाच काही भागांत ढगाळ वातावरण आणि तुरळक पावसाची शक्यता कायम आहे. यंदाच्या पावसाळ्यात राज्यात सरासरीच्या तुलनेत १९ टक्के पावसाची तूट नोंदविण्यात आली असून, मराठवाड्याला त्याचा सर्वाधिक फटका बसला आहे. मराठवाड्यात तब्बल ३९ टक्के, तर विदर्भात २६ टक्के पावसाची घट झाली आहे.

मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू झाल्याने हवामानात झपाट्याने बदल होत आहेत. सकाळच्या वेळी काही ठिकाणी धुके आणि दव पडत असले तरी दुपारनंतर उन्हाचा चटका जाणवत आहे. त्यामुळे आगामी काळात दिवसाचे तापमान वाढण्याची शक्यता असून, ऑक्टोबरच्या सुरुवातीलाच उकाड्याचा अनुभव येण्याची चिन्हे आहेत.देशातही यंदा पावसाची कमतरता जाणवली आहे. देशाच्या पातळीवर सरासरीच्या तुलनेत सुमारे १२ टक्के कमी पाऊस झाला आहे. महाराष्ट्रात ही तूट १९ टक्क्यांवर पोहोचली आहे. त्यात मराठवाड्यात सर्वाधिक ३९ टक्के पावसाची घट झाली असून, विदर्भात २६ टक्के तूट नोंदविण्यात आली आहे. त्यामुळे खरीप हंगामावरही पावसाच्या असमान वितरणाचा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे.दरम्यान, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांत अद्याप पावसाला पोषक वातावरण आहे. सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे.

## फटाक्यांवर पूर्ण बंदी नाही-सुप्रिम कोर्ट

### दिवसभर फोडण्यासही मनाई

नवी दिल्ली:दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या आतषबाजीमुळे होणारे ध्वनी व वायुप्रदूषण हा दरवर्षी चर्चेचा विषय ठरतो. फटाक्यांमुळे प्रदूषणाची पातळी वाढत असल्याने त्यावर संपूर्ण बंदी घालण्याची मागणीही विविध स्तरांतून केली जाते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने फटाक्यांवर देशव्यापी सरसकट बंदीचा मार्ग स्वीकारण्याऐवजी पर्यावरण संरक्षण आणि सणाच्या परंपरा यांच्यात समतोल राखण्यावर भर दिला आहे. फटाक्यांच्या वापरासाठी निश्चित वेळेचे बंधन, परवानगी असलेल्या फटाक्यांचा वापर आणि प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक असल्याचे न्यायालयाच्या निर्देशांत स्पष्ट करण्यात आले आहे.दिवाळीच्या दिवशी फटाके फोडण्यासाठी रात्री ८ ते १० वाजेपर्यंतची वेळ सर्वोच्च न्यायालयाच्या आधीच्या निर्देशांमध्ये निश्चित करण्यात आली आहे. ही मर्यादा देशभर लागू असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे दिवाळीच्या उत्साहात फटाक्यांची आतषबाजी करताना नागरिकांनी निर्धारित वेळेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.सर्वोच्च न्यायालयाने कमी उत्सर्जन करणारे आणि ग्रीन क्रॅकर्स म्हणून मान्यताप्राप्त फटाके वापरण्यावर भर दिला आहे. न्यायालयाच्या निर्देशांनुसार परवानगी नसलेले किंवा प्रतिबंधित रासायनिक घटक असलेले फटाके बाजारात विकणे अथवा वापरणे यावर निर्बंध आहेत.

## कृषी विभागातील कथित गैरव्यवहाराची चौकशी करा

### शेतकरी,शेतमजूर पंचायतचे आंदोलन




नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कळसाईत यांच्या कार्यकाळातील कथित गैरव्यवहार, माहितीच्या अधिकारांतर्गत मागितलेली माहिती देण्यास टाळाटाळ, न्यायालयीन आदेशांची अंमलबजावणी न करणे तसेच मजुरांच्या नियुक्त्या व ज्येष्ठता यादीतील कथित अनियमिततेच्या निषेधार्थ शेतकरी शेतमजूर पंचायत महाराष्ट्रच्या वतीने आज, ३० सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

संघटनेच्या वतीने जिल्हा प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनात कृषी विभागातील मजुरांच्या नियुक्त्या, बदल्या, वेतनासाठी उपलब्ध निधी तसेच कथित आर्थिक गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कळसाई यांच्या कार्यकाळातील विविध प्रकरणांची चौकशी करून त्यांची बदली करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी शेतमजूर पंचायत महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष बळवंत मोरे यांनी केली आहे. तसेच माहितीच्या अधिकारातून **पान ४ वर**

## राज्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करावा

### अ.भा.किसान मजदूर सभेचे आंदोलन



नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करावा, या मागणीसह अखिल भारतीय किसान मजदूर सभेच्या वतीने आज (बुधवार) दि.३० सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

राज्यात कमी पावसामुळे शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असून, शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली. निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये महाराष्ट्रात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करणे, सिमेंट रस्ते, पर्वत व नदीपात्रातील वाळू उत्खनन तसेच वृक्षतोडीवर कठोर कारवाई करून कायमस्वरूपी बंदी घालणे, दुष्काळग्रस्त भागातील जलसाठे व सिंचन विकासाला गती देणे आणि भूमिहीनांना जमीन उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. तसेच दुष्काळ निवारणासाठी केंद्र व राज्य शासनाने भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, पिकांच्या नुकसानीची भरपाई वाढवावी, ऊस, केळी, कापूस, सोयाबीन, ज्वारी, मूग-उडीद आदी पिकांना हेक्टरी वाढीव नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली. वीटभट्टी कामगार व स्थलांतरित कामगारांना रोजगार आणि पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. यावेळी कॉ.अशोक घायाळे, **पान ४ वर**

## एमपीडीए अंतर्गत दोन सराईत गुन्हेगार स्थानबद्ध

नांदेड/प्रतिनिधी-एमपीडीए अंतर्गत दोन सराईत गुन्हेगारांना पोलीसांनी एका वर्षासाठी स्थानबद्ध केले असून त्यांची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली आहे.

श्रीनिवास उर्फ आदु अनिल जाधव (वय २०) रा.गोवर्धनघाट पुलाजवळ, दिलीपसिंग कॉलनी,नांदेड, जयमलसिंग उर्फ गगा हरपसिंग धालीवाल (वय २५) रा.अबचलनगर, नांदेड या दोन सराईत गुन्हेगाराविरुध्द खून, जबरी चोरी, शासकीय कामात अडथळा, अवैध शस्त्र बाळगणे व इतर गंभीर स्वरुपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. पोलीसांनी दोन्ही गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केल्यानंतरही त्यांच्या वर्तुवणुकीत कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. वजिराबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक श्री.कुंभार यांनी दोन्ही गुन्हेगारांविरुध्द एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्याकडे पाठविला होता. पोलीस अधीक्षकांनी प्रस्तावातील आवश्यक बाबीची पुर्तता करुन मंजुरीसाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्याकडे पाठविला. जिल्हाधिकाऱ्यांनी सदर प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर पोलीसांनी श्रीनिवास उर्फ आदु अनिल जाधव व जयमलसिंग उर्फ गगा हरपसिंग धालीवाल या दोन्ही गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत एका वर्षासाठी स्थानबद्ध केले. दोन्ही गुन्हेगारांची रवानगी छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात करण्यात आली. पोलीसांनी चालु वर्षात आतापर्यंत २६ सराईत गुन्हेगारांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध केले आहे.

## किनवट-माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कापसाची आदिलाबादमध्ये होणार खरेदी

### आ.भीमराव केराम यांच्या प्रयत्नांना यश



मांडवी/प्रतिनिधी-किनवट व माहूर तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या गेल्या आठ वर्षांपासूनच्या प्रलंबित मागणीला अखेर मोठे यश मिळाले आहे. आ.भीमराव केराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तेलंगणातील आदिलाबाद येथील सी. सी. आय.खरेदी केंद्रांवर किनवट व माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासंदर्भात केंद्र सरकारकडून आदिलाबादच्या जिल्हाधिकाऱ्यांना अधिकृत आदेश प्राप्त झाले आहेत.

आदिलाबादचे जिल्हाधिकारी राजर्षी शाह यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील कापूस खरेदीसाठी विशेष स्वरूपात तीन जिनिंग मिल्स मंजूर करण्यात येणार असून, केवळ त्याच ठिकाणी ही खरेदी प्रक्रिया पार पडेल. किनवट आणि माहूर तालुक्यातील सुमारे १७६ गावांमधून कापूस आदिलाबाद मार्केटमध्ये येण्याची शक्यता आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातून तब्बल १० लाख क्विंटल कापूस आदिलाबादमध्ये विक्रीसाठी येईल, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात आला आहे. आदिलाबाद मार्केट कमिटीचे माजी चेअरमन शेखर रेड्डी येलट्टीवार, किसान मोर्चे किनवट तालुका अध्यक्ष बजरंगरेड्डी सिंगडवार, भाजपचे संजीवरेड्डी येलट्टीवार यांच्या सह अनेक शेतकऱ्यांनी हे गेल्या आठ वर्षांपासून या प्रश्नासाठी पाठपुरावा करत होते. त्यांनी या समस्येकडे आ.भीमराव केराम आणि आदिलाबादच्या स्थानिक आमदारांचे लक्ष वेधले होते. आमदार भीमराव केराम यांनी केंद्र शासनाकडे किनवट आणि माहूरच्या कापूस उत्पादकांची व्यथा मांडत, आदिलाबादच्या भारतीय कापूस महामंडळाच्या केंद्रांवर महाराष्ट्रातील कापूस खरेदी सुरू व्हावी, यासाठी सातत्याने यशस्वी पाठपुरावा केला. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर आदिलाबादचे जिल्हाधिकारी राजर्षी शाह यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीस राष्ट्रीय अनुसूचित जमातीचे अनवेशक गोवर्धन मुंडे किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे, दत्ताराम मोहिते, शिवाजी घोगरे पाटील, किनवट कृषि अधिकारी निमोड, रवी राठोड, बालाजी बामणे, दत्ता आडे, बजरंगरेड्डी, संजीवरेड्डी, शेखरेड्डी तसेच आदिलाबाद मार्केट कमिटीचे चेअरमन श्रीकांतरेड्डी, आदिलाबाद माहपौर बी. अनुषा, आदिलाबादचे पोलीस अधीक्षक अखिल महाजन, उपविभागीय पोलीस अधिकारी जीवनरेड्डी, आणि आदिलाबाद स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

## लष्कर-ए-तोयबाचा मुख्य कमांडर ठार

जम्मू: दक्षिण काश्मीर मधील युसमार्ग येथे मंगळवारी रात्री उशिरा सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत लष्कर-ए-तोयबाचा प्रमुख कमांडर सुलेमान शाह उर्फ फौजी मुसा ठार झाला. गुप्त माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर, जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि सीआरपीएफने कोरग परिसरात संयुक्त शोधमोहीम सुरू केली. सुरक्षा दलांना पाहताच दहशतवाद्यांनी गोळीबार केला. त्यानंतर झालेल्या जोरदार चकमकीत मुसा ठार झाला. आणखी तीन दहशतवादी लपून बसल्याचा संशय आहे.

# आंदोलनच का करावे लागते?

देशात आणि राज्यात सध्या आंदोलनांचा सुकाळ झाला आहे. एका मागून एक प्रश्न घेऊन नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, कामगार, विविध समाजघटक आणि राजकीय पक्ष रस्त्यावर उतरत आहेत. मोर्चे, निदर्शने, उपोषणे, रास्ता रोको आणि धरणे यांची मालिकाच सुरू आहे. आंदोलनातून प्रश्न किती मार्गी लागतात, हा आता संशोधनाचा विषय ठरावा, अशी परिस्थिती आहे. मात्र त्यापेक्षाही गंभीर प्रश्न असा आहे की, लोकांना आपला प्रश्न शासनाच्या कानावर घालण्यासाठी वारंवार रस्त्यावर का उतरावे लागते? लोकशाहीमध्ये आंदोलन हा नागरिकांचा अधिकार आहे. अन्यायाविरोधात आवाज उठवणे, सरकारला जाब विचारणे आणि आपल्या मागण्यांसाठी शांततामय मार्गाने संघर्ष करणे, हे लोकशाहीचेच लक्षण आहे. परंतु प्रत्येक प्रश्नासाठी आधी निवेदन, मग पाठपुरावा आणि शेवटी आंदोलन, अशी जर प्रशासनाची कार्यपद्धती बनत असेल तर त्याचे आत्मपरीक्षण सत्ताधाऱ्यांनी आणि प्रशासनाने करायला हवे. शासन व्यवस्था लोकांचे प्रश्न ऐकण्यासाठी आहे की; प्रश्न ऐकवण्यासाठी जनतेने रस्त्यावर उतरायचे, हा मूलभूत प्रश्न आहे.वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित या प्रश्नावर देशभरातून आवाज उठला. आंदोलनाचा दबाव, न्यायालयीन प्रक्रिया आणि राजकीय घडामोडींमुळे हा विषय राष्ट्रीय पातळीवर गाजला. पुढे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची घटना घडली. म्हणजेच आंदोलन, जनक्षोभ आणि राजकीय दबाव यांचा परिणाम सत्तेच्या सर्वोच्च स्तरापर्यंत पोहोचू शकतो, हे पुन्हा एकदा दिसून आले.या असंतोषाला आणखी एक वेगळा संदर्भ मिळाला. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या काही वक्तव्यांवरून आरटीआय कार्यकर्ते, कायद्याच्या क्षेत्रातील तरुण आणि आंदोलनकर्त्यांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली. न्यायव्यवस्थेसारख्या संवेदनशील संस्थेबाबत नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाले तर त्या प्रश्नांना गांभीर्याने उत्तर मिळणे आवश्यक आहे. संस्थांवरील विश्वास हा लोकशाहीचा कणा आहे आणि तो टिकवण्याची जबाबदारी सर्व संबंधित संस्थांची आहे.महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा प्रश्नही आंदोलनांच्या प्रदीर्घ मालिकेतूनच पुढे आला. मनोज जरांगे–पाटील यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनादरम्यान अंतरवाली सराटी येथे पोलिसांचा लाठीचार्ज झाला आणि त्यानंतर परिस्थिती अधिक चिघळली. पुढे मराठा समाजाचे मुंबईतील अभूतपूर्व आंदोलन झाले. आरक्षणासारखा संवेदनशील प्रश्न चर्चेच्या आणि संवादाच्या मार्गाने सोडवण्याऐवजी तो वारंवार रस्त्यावर येत राहिला, ही व्यवस्थेसाठी निश्चितच चिंतेची बाब आहे.आता अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्नही आंदोलनाच्या केंद्रस्थानी आला आहे. मातंग समाजासह विविध संघटनांनी मुंबईत तीव्र आंदोलन करून आपल्या मागण्या सरकारसमोर मांडल्या आहेत. एकीकडे उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ, तर दुसरीकडे त्याला विरोध करणाऱ्या भूमिका रस्त्यावर दिसत आहेत. समाजातील अस्वस्थता सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी पुन्हा मोर्चे आणि आंदोलनांचा आधार घ्यावा लागत आहे.याच काळात देशाच्या लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरूनही आंदोलन पेटले आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करीत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी देशभर आंदोलन केले आहे. मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण, मतदारांची नावे वगळली जाणे आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता याबाबत विरोधी पक्षांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. या आरोपांबाबत निवडणूक आयोगाची भूमिका आणि वस्तुस्थिती यांची स्वतंत्रपणे तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र निवडणूक प्रक्रियेसारख्या लोकशाहीच्या मूलभूत व्यवस्थेबाबत नागरिकांच्या मनात संशय निर्माण होत असेल तर तो दूर करण्यासाठी पारदर्शक संवाद होणे गरजेचे आहे. मुद्दा काँग्रेसचा असो, भाजपचा असो किंवा कोणत्याही राजकीय पक्षाचा असो; प्रश्न व्यक्ती किंवा पक्षाच्या पलीकडचा आहे. देशातील लोकशाही संस्था, प्रशासन आणि शासन यांच्याबद्दल जनतेचा विश्वास टिकवणे महत्त्वाचे आहे. सत्ताधारी पक्षावर टीका करणारा प्रत्येक आवाज देशविरोधी किंवा विकासविरोधी असतो, असे मानणे जितके चुकीचे आहे, तितकेच प्रत्येक आंदोलनातील प्रत्येक मागणी आपोआप योग्य आहे, असे मानणेही योग्य नाही. लोकशाहीत प्रश्न विचारले गेले पाहिजेत, त्यांची उत्तरेही तथ्यांच्या आधारे दिली गेली पाहिजेत.प्रश्न मग पुन्हा तोच आंदोलनच का करावे लागते? एखादा नागरिक पाण्यासाठी तक्रार करतो, शेतकरी नुकसान भरपाईसाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवतो, विद्यार्थी न्यायासाठी आवाज उठवतो, कर्मचारी आपल्या हक्कासाठी निवेदन देतो, एखादा समाज आरक्षणासाठी सरकारकडे पाठपुरावा करतो आणि राजकीय पक्ष निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरतात. प्रत्येक वेळी प्रशासनाने आंदोलनाची वाट पाहायची का? लोकशाहीत आंदोलन हे शेवटचे अस्त्र असावे; शासनाशी संवाद साधण्याचे पहिले माध्यम नव्हे. सत्ताधाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांकडे केवळ विरोधक म्हणून पाहण्याची गरज नाही. आंदोलन हा अनेकदा व्यवस्थेतील त्रुटी दाखवणारा इशारा असतो. तो इशारा ऐकण्याऐवजी आंदोलकांवरच प्रश्न उपस्थित केले, तर असंतोष अधिक वाढतो. त्याचवेळी आंदोलनकर्त्यांनीही तथ्य, कायदा आणि शांततामय लोकशाही मार्ग यांचे भान ठेवणे आवश्यक आहे.शासन व्यवस्था खऱ्या अर्थाने संवेदनशील असेल तर निवेदन आल्यानंतर आंदोलनाची गरज भासू नये. तक्रार आली की तिची नोंद व्हावी, सुनावणी व्हावी, निर्णय व्हावा आणि निर्णयाची अंमलबजावणीही वेळेत व्हावी. फाईल हलवण्यासाठी आंदोलन आणि सरकार हलवण्यासाठी मोर्चा, ही लोकशाहीची नियमित कार्यपद्धती बनणे धोकादायक आहे. सत्ताधाऱ्यांनी आणि प्रशासनाने आता आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. प्रश्न किती आंदोलने झाली याचा नसून, आंदोलन होण्यापूर्वी किती प्रश्न सोडवले गेले, याचा आहे. जनतेला प्रत्येक वेळी रस्त्यावर उतरावे लागत असेल, तर प्रश्न फक्त आंदोलकांचा नसतो; प्रश्न त्या व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा असतो. लोकशाहीची खरी ताकद आंदोलनाच्या संख्येत नसते; ती जनतेचा आवाज वेळेवर ऐकणाऱ्या व्यवस्थेत असते. निवेदन दिल्यावरही दार बंद, तक्रार केल्यावरही फाईल बंद आणि शेवटी रस्त्यावर उतरल्यावरच सरकारचे डोळे उघडणार असतील, तर ही केवळ आंदोलनकर्त्यांची समस्या नाही; ही संपूर्ण प्रशासन व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे.म्हणूनच आज जनतेनेच नव्हे, तर सत्ताधाऱ्यांनी आणि प्रशासनानेही स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे, ''आंदोलनच का करावे लागते?''

# विद्यार्थ्यांचे नुकसान टाळायचे असेल तर...

अंकुश शिंगाडे
नागपूर

सध्याचा काळ हा डीजीटल युगाचा काळ आहे. एका बटनावर सगळी माहिती उघडते. सध्या ऑनलाईन प्रक्रिया सुरु झालेली आहे व अशा युगात ऑनलाईन प्रक्रियेला फारच महत्व प्राप्त झालेलं आहे.सध्याच्या काळात जी ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाली. त्यात फक्त एक बटन महत्वाची आहे. ती बटन दाबली की बस, खेळ खल्लास. सगळी माहिती आपली स्वतःची इतरांना एका सेकँदापेक्षाही कमी अवधीत दिसते. ज्यातून सायबर गुन्हेगारी देखील वाढलेली आहे. आता कुणाला बँकेत जास्त प्रमाणात पैसे ठेवता येत नाहीत. ना ही काळा पैसा कमवता येवू शकत. अशी स्थिती आज होवून बसलेली आहे.

ऑनलाईन प्रक्रियेचा फटका हा सामान्य कुटुंबालाही बसलेला असून आता रेशनचं सामानही ऑनलाईन प्रक्रियेतून मिळू लागलेलं आहे. त्यासाठी अंगठ्याचा ठसा लावणे सुरु झालेले आहे. आता राशन घेतेवेळेसही अंगठाच प्रतिनिधित्व करीत असून ज्याला ज्याला राशन मिळतं, त्यांचा अंगठा हा व्यवस्थित जुळायला हवा. असं सांगीतलं जातं. अन तो जय जुळत नसेल तर राशनच मिळत नाही. कधी कधी आपलेच आपल्या खात्यातील पैसे काढत असतांना आपलं आधारकार्ड अपडेट करणं गरजेचं असतं. जे आधारकार्ड अंगठ्याच्या ठस्यानं व डोळ्याच्या माध्यमातून अपडेट होतं. परंतु ऑनलाईन प्रक्रियेतील काम करणारा संगणक हा आपण स्वतः तोच व्यक्ती असूनही आपले डोळे व अंगठे जुळवू शकत नाही. मग आपल्याला काही दिवस वाट पाहावी लागते. याच ऑनलाईन प्रक्रियेच्या अशा बाबींमुळं कधीकधी महत्वाची कामेही अडतात. कधीकधी तर ऑनलाईन प्रक्रियेतून कार्य करीत असतांना कव्हरेज नसतं. त्यामुळंच कितीतरी तास तो कव्हरेज येण्याची वाट पाहावी लागते. ज्यातून आपली कामंही खोळंबत असतात. कधीकधी हा कव्हरेज येण्यासाठी दोन दोन दिवस वाट पाहावी लागते. त्यासाठी चकरा माराव्या लागतात. अर्थातच वेळेचा अपव्यय होत असतो. म्हणतात की ऑनलाईन प्रक्रियेच्या माध्यमातून भ्रष्टाचाराला वाव नाही. परंतु भ्रष्टाचार हा होतच असतो. जसा सातबारा काढायचा असेल तर ऑनलाईन सातबारा तर मिळतोच. परंतु त्या सातबाऱ्यावर जी स्वाक्षरी आणि ठसे येतात. त्यासाठी पैसे मोजावेच लागतात. कार्यालयातही कोणत्याही गोष्टी ऑनलाईन माध्यमातून मिळवायच्या असतील तर ती ऑनलाईन प्रक्रिया सामान्य माणसांना समजत नसल्यानं त्या प्रक्रियेसाठी जो पैसा मोजावा लागतो. तो भ्रष्टाचारच असतो. शिवाय ऑनलाईन प्रक्रिया जरी असली तरी आपली लवकर कामे करौन घेण्यासाठी पैसे मोजावेच लागतात. तोही भ्रष्टाचारच असतो. अर्थातच ऑनलाईन प्रक्रिया जरी असली तरी कोणतीही कामं लवकर करुन घेण्यासाठी पैसेच मोजले जातात. हाच भ्रष्टाचार असतो. अन भ्रष्टाचार समुळ उपटून काढायचा असेल तर माहिती अधिकाराचा कायदा आहे. परंतु त्यातही अधिकारी वर्गानं पळवाट काढून मूळ स्वरुपात बऱ्याच सुधारणा केलेल्या आहेत व त्या आपल्याला त्रास होणार नाही. अशा पद्धतीनं सोईस्कर केलेल्या आहेत.

आज जिकडेतिकडे सुरु झालेली ऑनलाईन प्रक्रिया. त्या प्रक्रियेचा फटका जसा कुटूंबाला बसला. तसाच फटका विद्यार्थ्यांनाही बसत असलेला दिसतो. ऑनलाईन प्रक्रिया शाळेतही सुरु झालेली असून ज्याप्रमाणात ऑनलाईन प्रक्रियेतून



आपल्या स्वतःची माहिती एका बटनेवर सापडते. तशीच माहिती एका बटनेवर विद्यार्थ्यांचीही सापडायला हवी. असा कयास आहे व असा कयास असतांना आजच्या काळात काही काही शाळेत अशीही बरीच मुलं आहेत की ज्यांचे पालक सुज्ञ नाहीत. ज्यांच्या पालकांना आपली पोटाची गरज भागविण्यासाठी कामाला जावं लागतं. अशा पालकांना या ऑनलाईन प्रक्रियेच्या माध्यमातून कामं करुन घेत असतांना जर कव्हरेज नसेल वा वारंवार नेट जात असेल तर ऑनलाईन प्रक्रिया संकेत स्थळाला भेट द्यायला अजीबात वेळ नाही. अशावेळेस अशी पालकमंडळी आपल्या मुलांचे दस्तावेज शाळेत आणूनच देत नाहीत. ज्यातून असे विद्यार्थी रोज शाळेत तर येतातच. परंतु त्यांची नावे ऑनलाईन होत नाही.

एक उदाहरण आहे. एक सामान्य कुटुंब. त्या कुटुंबात चार मुली आहेत. मुलगा माणणारं ते कुटूंब. कुटूंब तसं फारच गरीब. दोघंही पती पत्नी कामाला जातात. कारण घरातील सर्व मुलांचं पोट भागवावं लागतं. त्यांना कामाला जावंच लागतं. कारण त्यांना मुलांचे पोट भागवावे लागतात. ज्यातून त्यांच्याजवळ ऑनलाईन प्रक्रियेच्या माध्यमातून शाळेत नाव दाखल करण्यासाठी लागणारी कागदपत्र बनवायला पुरेसाही वेळ मिळत नाही व ते तसा वेळही काढत नाही. वेळ काढू शकत नाही. त्याचं कारण ते देतात की जर ते दोघंही पतीपत्नी एखाद्या दिवशी घरी राहिलेवतर त्यांची चूल पेटणार नाही. मग पोटाला अन्न कुठून मिळेल? त्यात घरात कापडलत्ते मुलींना देणं आलंच. दोन मोठ्या मुली शिकतात. त्यांची ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण झालेली आहे व त्यांची नावंही ऑनलाईन झालेली आहेत. तशी तिसऱ्या क्रमांकाची मुलगीही शिकत आहे. परंतु तिचं आधारकार्डच नाही. आधारकार्ड बनवलेलं नाही. आधारकार्ड बनवायला जन्मतारखेचा दाखला लागतो. तोही बनविलेला नाही. अन जन्मतारखेचा दाखला आणि आधारकार्ड नसेल तर ऑनलाईन शाळेत नाव दाखल करण्याची प्रक्रिया पुर्ण होऊ शकत नाही. ज्यातून शाळेत नाव दाखल होत नाही. यात प्रश्न हा पडतो की मुलं दररोज शाळेत येतात. परंतु त्यांचे नाव शाळेत दाखल होत नसल्यानं त्यांच्या शिक्षणाचा बोजवारा वाजत आहे. ज्या बोजवाऱ्यातून त्यांचं शैक्षणिक नुकसान होत आहे. यावर शिक्षण विभागाकडे उपाय नाही. शिक्षकांकडेही उटाय नाही. आईवडील तत्सम प्रकारचे दाखले काढायला तयार नाहीत. ते म्हणतात की नुकसान झालं तरी चालेल. परंतु कागदपत्र काढत नाही. दुसरं आणखी एक प्रकरण असंच की मुलं ही कितीतरी लांबच्या पट्ट्यातील आहेत. त्यांच्याजवळ जन्मतारखेचा दाखला नाही. मग आधारकार्ड कसं बनणार. अन आधारकार्ड बनवायचे असेल तर जन्मतारखेचा दाखले लागतो. तो कुठून आणणार? त्यावर पालकांना म्हटलं तर पालक जन्मतारखेचा दाखला आणायलाही तयार नाहीत. अशावेळेस ऑनलाईन प्रक्रिया आज जरी कामाची असली तरी ती आळशी पालकांच्या दृष्टिकोनातून अशक्यप्राय गोष्ट आहे.

अलिकडील काळात मराठी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थी दिसत नाहीत. त्यामुळंच विद्यार्थी आपल्याकडेच टिकावा म्हणून स्पर्धा चाललेली आहे. त्यामुळंच ज्याठिकाणी विद्यार्थी बसतात, त्या शाळेत त्याचा शाळा सोडण्याचा दाखदा नसतोच आणि ज्याठिकाणी त्याचं नाव दाखल असतं, तिथं तो विद्यार्थी बसत नाहीत. मग रस्सीखेच सुरु होते. रस्सीखेचमध्ये आपल्या शाळेची पटसंख्या तुटू नये म्हणून कागदावर दाखविण्यासाठी, शाळा सोडण्याचा दाखलाच प्रमाण म्हणून धरुन विद्यार्थी शाळेत बसत नसतांनाही तो विद्यार्थी आपल्याच शाळेत बसतो असे दाखवतात व शाळा सोडण्याचा दाखला, तो विद्यार्थी ज्या शाळेत बसतो, त्यांच्या सुपूर्द करीत नाहीत. ज्यातून त्या विद्यार्थ्यांच्या कक्षेचं अतोनात नुकसान होतं. तो विद्यार्थी जसा पुर्वी ऑनलाईन प्रक्रिया नसल्यानं पटावर येत होता. तसा आजच्या ऑनलाईन प्रक्रियेतून पटावर येत नाही.आजची वास्तविकता अशीच आहे. त्यातच काही ठिकाणी पती पत्नीचीही भांडणं होतात. ज्या भांडणातून पत्नी आपल्या माहेरी आपली मुलं घेवून येते. मग वडील शाळेत जातात व मुख्याध्यापक साहेबांना सांगून ठेवतात की त्यांच्या मुलांचा शाळेचा दाखला त्याला विचारल्याशिवाय देवू नये. असा दाखला न मिळाल्यानं मुलं वर्षोगणती त्याच त्या वर्गात चारत असतात. त्याला बढती मिळत नाही.

दाखले कधी शाळेचं शुल्क बाकी आहे, कधी आपल्या शाळेची पटसंख्या तुटते. अशा प्रकारच्या कोणत्या ना कोणत्या कारणानं मिळत नाहीत. त्यातच आजच्या काळात असलेल्या आधारकार्डच्या अनिवार्यतेनं, तसंच विद्यार्थ्यांचा जन्म होण्याचं ठिकाण व त्याचा अधिवास, यातील अंतर तीव्र असल्यानं तर कधी महागाईच्या गर्तेत जास्त मुलं असलेल्या परिवारात मुलांचं व आपलं पोट भागवीत असतांना मुलांचं शिक्षण वाया जातं. ज्यातून मुलं शाळाबाह्य होवू शकतात किँवा मुलं शाळाबाह्य होण्याची भीती निर्माण होवू शकते. यावर शासनानं पर्याय म्हणून उपाय काढला, जो पुरेसा नाही. तो उपाय म्हणजे वयानुसार कक्षा निवडणे व त्या कक्षेत प्रवेश देणे. परंतु हे जरी बरोबर असलं तरी शासनानं मुलं ज्या शाळेत बसत असतील. त्या शाळेत, शाळेचा दाखला पर्याय म्हणून न धरता, केवळ डोकँ मोजावं व त्याला कोणत्याही प्रकारच्या शिक्षणापासून वंचीत करु नये. राहिला आधारकार्डचा आणि जन्मतारखेच्या दाखल्याचा प्रश्न तर प्रत्येकच शिक्षकाला प्रशिक्षण देवून ऑनलाईन पद्धतीनं आधारकार्ड कसं काढावं. जन्मतारखेचा दाखला कसा काढावा? याची कला शिक्षकांना शिकवावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांचे तरी आधारकार्ड त्यांना काढता येवू शकतील. जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या पालकाने जरी आधारकार्ड काढले नसतील वा काढत नसतील तरी ते कार्ड शिक्षकांच्या माध्यमातून निघायला हवेत व विद्यार्थ्यांना नव्हे तर त्या विद्यार्थ्यांच्या पालकांना विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काळजी करण्याची गरज उरणार नाही. जेणेकरुन विद्यार्थी कोणत्याही शाळेत जात असेल, तरी त्याला सहज व सुलभ शिकता येईल. हे तेवढंच खरं.

# सदाबहार गीतांच्या सुरांनी देगलूरकर झाले मंत्रमुग्ध

देगलूर/प्रतिनिधी-संगीत साधना मंच, देगलूरच्या वतीने आयोजित सुनहरी यादें या मराठी-हिंदी गीतांच्या सुरेल कार्यक्रमाने देगलूरकरांना जुन्या आठवणींना उजाळा देणाऱ्या सदाबहार गीतांची मधुर मेजवानी दिली. भावपूर्ण गायन, दर्जेदार वाद्यसंगत आणि रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण वातावरण संगीतमय झाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संगीत गुरू पंडित बाबुराव उप्पलवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते लक्ष्मीकांत पदमवार, नगरसेवक नंदू सेठ शाखावार, नगरसेवक बबलू टेकाळे, बसवराज द्याडे, माजी नगरसेवक संजय चिन्नमवार, शैलेंद्र चौहान, दत्तू अण्णा जोशी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा संगीत साधना मंचच्या वतीने सन्मान करण्यात आला. गायिका ललिता डुलगच यांनी सत्यम् शिवम् सुंदरम् या गीताने गायन पर्वाची सुरुवात केली. त्यानंतर संकल्पक विजय बंदमवार, जसपाल, लक्ष्मण लिंगापुरे, अध्यक्ष लक्ष्मण अमृतवार, सचिव गोविंद सुवर्णकार, सुरेश देशमुख, डॉ. सुनील जाधव, संजय मोतेवार, गंगाप्रसाद मिर्जापुरकर, बलराज पटणे, यशवंत काबदे, सुवर्णा केळगिरे आदी गायक-कलाकारांनी विविध मराठी व हिंदी गीतांचे सादरीकरण केले. प्रेम, विरह, भक्ती आणि आनंद अशा विविध भावछटांनी नटलेल्या गीतांना रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. हास्यसम्राट रमेश गिरी यांनी आपल्या विनोदी सादरीकरणातून उपस्थितांचे मनोरंजन केले. कार्यक्रमाला नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, पुंडलीक टोके, ज्येष्ठ पत्रकार शिवानंद स्वामी, बासरीवादक आयनोद्दिन वारसी, ॲड.योगेश देशपांडे, उपप्राचार्य दिलीप भडके, डॉ. विजय गउळकर, डॉ. आशुतोष सदावर्ते, संजय



ठाणेकर, सूर्यकांत सुवर्णकार, सत्यनारायण नागोरी यांच्यासह राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच मोठ्या संख्येने संगीतप्रेमी उपस्थित होते. विजय बंदमवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या वादक, साऊंड व प्रोजेक्टर टीमसह सहकाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. जुन्या आठवणींना उजाळा देणारी सदाबहार गाणी, भावपूर्ण सादरीकरण आणि रसिकांची उत्स्फूर्त दाद यामुळे सुनहरी यादें ही मैफल देगलूरच्या सांस्कृतिक विश्वातील अविस्मरणीय संगीतपर्व ठरली. याबरोबरच चार वर्षाची कु. श्रीशा सचिन अमृतवार हिने अभी ना जाओ छोड़कर हे गीत सादर करून उपस्थिताना मंत्रमुग्ध केले. शेवटी डॉ. सुनील जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.

# भगवंताच्या नामाने मनुष्य जीवनाचा उद्धार होतो-साध्वी मुक्ती नाथ माऊली



भोकर/प्रतिनिधी-मनुष्य जीवन प्राप्त झाल्यानंतर संतांची संगती करावी, भक्तीचा मार्ग धरावा त्यामुळे जीवन सार्थकी लागते, भगवंताच्या नामाने जीवनाचा उद्धार होतो असे अध्यात्मिक विचार ह.भ.प. बाल योगिनी नाथ कन्या साध्वी मुक्तीनाथ गुरु महेश्वरीनाथ माउली यांनी भोकर येथे बोलताना मांडले.

गंदेवार कॉलनी भोकर येथे कल्पेश रायपत्रेवार परिवाराच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याचसाठी केला होता अट्टाहास या अभंगावर साध्वी मुक्तीनाथ माऊली यावेळी बोलताना म्हणाल्या मृत्यू हे जीवनाचे परम सत्य आहे. संत तुकाराम महाराज जीवनात निश्चिंत होते मृत्यूला सुद्धा ते घाबरले नाहीत, देवाने त्यांना विमान पाठवलं, उद्देश ठेवून भक्ती करा चांगलं जगावं आणि चांगलं मरावं यासाठी आयुष्य नामसंकीर्णतनात घालावं लागते. आज नाम घेण्यासाठी कुणाला वेळ नाही, साऱ्यांनाच संसाराची घाई पडलेली आहे. संत नामदेव महाराज पंजाब मध्ये गेले तिथे भागवत धर्माचा प्रचार केला. आपल्या हृदयात राम बघा, सावधान रहा, दान करा, संत संगतीत विसावा मिळतो, आपल्या मनाला आवरा, आज कुणी कीर्तन ऐकत नाही, परमार्थ करीत नाही, मोबाईल अति वापर बंद करा,देव, धर्म, देशासाठी जगा, आयुष्य जगताना वासनेचे खडे बाजूला काढून जगा असे मौलिक विचार त्यांनी कीर्तनतून मांडले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# गावठाण प्रॉपर्टी कार्ड अन् पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर; नगराध्यक्ष दोसानींच्या पाठपुराव्याची दखल

माहूर/प्रतिनिधी-तीर्थक्षेत्र माहूर शहरातील नागरिक आणि भाविकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले गावठाण मोजणी व प्रॉपर्टी कार्ड तसेच भाविकांसाठी सुमारे तीन हेक्टर जागेवर कायमस्वरूपी पार्किंग व्यवस्था या दोन प्रश्नांसाठी नगराध्यक्ष फिरोज भय्या दोसानी यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू ठेवला आहे. याच पाठपुराव्याचा भाग म्हणून त्यांनी राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची नांदेड भेट घेऊन दोन्ही मागण्यांचे निवेदन सादर केले.

माहूर शहरातील गावठाण क्षेत्राची भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणी करून मालमत्तांचे सर्वेक्षण करणे आणि पात्र मालमत्ताधारकांना प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करून देणे, हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या प्रश्नामुळे नागरिकांना मालमत्ता खरेदी-विक्री, वारसा नोंद, कर्जप्रकरणे, बांधकाम परवानगी यांसह विविध शासकीय व वैयक्तिक व्यवहारांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगराध्यक्ष फिरोज भय्या डोसानी यांनी या प्रश्नाचे



गांभीर्य महसूल मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत माहूर शहरासाठी अद्ययावत आणि स्पष्ट मालमत्ता अभिलेख उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले. माहूर शहराच्या विकासाशी निगडित प्रश्न केवळ स्थानिक पातळीवर मांडून न थांबता ते थेट शासनाच्या संबंधित विभागापर्यंत पोहोचविण्याची भूमिका नगराध्यक्ष दोसानी यांनी घेतली आहे. त्यांच्या या प्रयत्नांना राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा लोकनेते अशोकराव चव्हाण आणि विधान परिषदेचे आमदार अमर राजूरकर यांनीही पाठिंबा देत महसूल मंत्र्यांकडे दोन्ही विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली.

नगराध्यक्ष फिरोज भय्या दोसानी यांच्या निवेदनाची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गांभीर्याने दखल घेत तात्काळ इंडॉर्समेंट करून जिल्हाधिकारी, नांदेड यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिल्याने गावठाण मोजणी, प्रॉपर्टी कार्ड आणि भाविकांसाठी पार्किंग या दोन्ही प्रश्नांवर आता प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. माहूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने नवरात्रोत्सव, दत्तजयंती तसेच विविध यात्रा आणि उत्सवांच्या काळात लाखो भाविक शहरात दाखल होतात. माहूरच्या विकासासाठी केवळ आश्वासनांवर न थांबता शासनाच्या संबंधित विभागांकडे प्रत्यक्ष पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न आहे. गावठाण प्रॉपर्टी कार्ड आणि पार्किंगचा प्रश्न नागरिक व भाविकांच्या हिताचा असून, त्यासाठी पुढील काळातही सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास नगराध्यक्ष फिरोज भय्या दोसानी यांनी व्यक्त केला.

## एक लाखाची घरफोडी

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील जैन मंदिर परिसरात अज्ञात चोरट्यांनी एका घराचे कुलूप तोडून कपाटातील एक लाख रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची घटना सोमवारी घडली आहे.

स्वाती संजय शिरसे रा. जैन मंदिर परिसर, मालेगाव रोड, नांदेड यांच्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे व रोख रक्कम असा १ लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. सौ.स्वाती शिरसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अखेर पालकमंत्री हदगाव तालुक्यातील दुष्काळ परिस्थिती पाहून गेले...!

हदगाव/प्रतिनिधी-हदगावचे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांनी केलेल्या विनंतीनुसार रविवारी पालकमंत्री अतुल सावे यांनी हदगाव तालुक्यातील काही भागांना प्रत्यक्ष भेटी देवून दुष्काळाची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधुन सरकार मदत करेल असे आश्वासन दिले.

पालकमंत्री अतुल सावे हे हदगाव तालुक्यातील रोडवरच्या असलेल्या नुकसान झालेल्या शेताची पाहणी केली आणि चटकन निघून गेले. हदगाव तालुक्यात आ. कोहळीकर याच्या विनंतीनुसार नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री आले असले तरी त्यांनी तालुक्यातील आतिशय पिकाचे नुकसान झालेल्या निवघा सर्कल तसेच बाभळी कोथळा व हदगांव शहराच्य परिसराच्या मंडळाच्या अश्या दुर्लक्षित भागातील पिकांची पाहणी करायला हवी होती. शहरात कोणतीही औद्योगिकरण नसल्याने येथील नागरिकांचे शेतमजुरांचे व शेतकऱ्यांचे जीवन केवळ शेतातील पिकावरच अवलंबून आहे. कारण या अगोदर कृषीमंत्री यांचा पण नांदेड जिल्हयात दौरा होता. हदगाव तालुक्यातील इतकी दुष्काळाची भयावह परिस्थिती असतानाही ते आले नाहीत, या विषयी कृषिमंत्र्याबद्दल शेतकऱ्यांना नाराजी आहे. विशेष म्हणजे या पालकमंत्र्याच्या दुष्काळी' दौऱ्याची कल्पनाही इतर राजकीय पक्ष असलेल्या पदाधिकाऱ्यांना पण असायाला हवी होती, ती पण दिसून आलेली नाही. विशेष म्हणजे स्थानिय सत्ताधारी असलेल्या पदाधिकाऱ्यांनाच पालकमंत्र्याच्या दौऱ्याची माहिती होती हे आवर्जून उल्लेख करावा लागेल. हदगाव तालुक्यात नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री येणार असल्याची माहिती महसूल प्रशासनाला व पोलीस प्रशासानास असुन ही त्यांनी या दौऱ्या विषयी इतकी 'गुप्तता ' पाळण्याचे कारण मात्र समजू शकले नाही. जेव्हा महसूल प्रशासनाला या पालकमंत्र्याच्या दौऱ्याविषयी विचारले असता त्यांनी सांगितले की त्यांचा दौरा अचानक होता अस सांगण्यात आले. विशेष म्हणजे जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या दौऱ्याच्या बाबतीत स्थानीय माध्यमातून पत्रकारांना माहिति न देण्याचे प्रशासनाचे प्रयोजन काय हे लक्षात आले नाही. यापूर्वी दुष्काळ कोणताही असो तालुक्यात राज्याचे कोणतेही मंत्री आले तरीही परिस्थितीची पाहणी केल्यानंतर लगेच तालुक्यातील वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत तहसील कार्यालयात एक छोटेखाणी बैठक घेऊन प्रशासनाला सूचना व पिडीत शेतकऱ्यांना दिलासा द्यायचे पण सध्याच्या सरकारमध्ये अशी स्थिती दिसून येत नाही.

# मानव विकासच्या योजने अंतर्गत विद्यार्थीनींना सायकलचे वाटप

धर्माबाद/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची कोंडी फोडत त्यांच्या पंखांना विश्वासाचे बळ देणारा एक अत्यंत कौतुकास्पद सोहळा धर्माबाद येथील गुरुकुल विद्यालयात पार पडला. मानव विकास योजनेअंतर्गत विद्यालयात भव्य सायकल वाटप सोहळा आणि नव्याने उभारण्यात आलेल्या आधुनिक अभ्यागत कक्षाचे थाटात उद्घाटन गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंठे यांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामीण भागात घर ते शाळा यातील अंतरामुळे मुलींच्या शिक्षणात येणारे अडथळे आता दूर होणार आहेत. सायकली मिळाल्यामुळे विद्यार्थिनींचा वेळ आणि श्रम तर वाचतीलच, शिवाय त्यांच्यात एक नवा आत्मविश्वास निर्माण होईल. या उपक्रमामुळे मुलींची शाळेतील उपस्थिती वाढेल आणि त्यांच्या उच्च शिक्षणाची वाट सुकर होईल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. हा उपक्रम केवळ प्रवासाचे साधन नसून महिला सक्षमीकरणाचे एक क्रांतीकारी पाऊल ठरत आहे. विद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या सुसज्ज अभ्यागत कक्षामुळे पालकांना आणि पाहुण्यांना सन्मानाची व स्वतंत्र जागा उपलब्ध झाली आहे. सरकारी किंवा निमसरकारी शाळांमध्ये अशा प्रकारची आधुनिक व्यवस्था निर्माण करून गुरुकुल विद्यालयाने प्रशासकीय संस्कृतीत एक आदर्श परिपाठ घालून दिला आहे. या दिमाखदार सोहळ्याला गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंठे यांच्यासह गट समन्वयक उसकेवार आबासाहेब, संचालक पुंडलिक गोपतवाड आणि मुख्याध्यापक मनमोहन कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

# जिल्ह्यातून हिरवा व वाळलेला चारा, गवत व वैरण जिल्ह्याबाहेर वाहतुकीस बंदी

नांदेड/प्रतिनिधी-सन २०२६ च्या खरीप हंगामात ट्रिगर-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. नांदेड जिल्ह्यात मुदखेड व मुखेड वगळता उर्वरित १४ तालुके दुष्काळग्रस्त घोषित करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झाल्यामुळे चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यात उपलब्ध असलेला हिरवा व वाळलेला चारा, गवत व वैरण जिल्ह्याबाहेर विक्री व वाहतूक करण्यास बंदी घातली आहे. महाराष्ट्र वैरण (निर्यात नियंत्रक) आदेश, २००१ मधील तरतुदींनुसार हा आदेश जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यातील पशुधनासाठी उपलब्ध चाऱ्याचे संरक्षण करून संभाव्य चारा टंचाईच्या काळात पशुपालकांना चारा उपलब्ध राहावा, हा या निर्णयाचा उद्देश आहे. या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. हा आदेश २९ सप्टेंबर २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहणार आहे.

# जी.डी.गोएंका हेल्थकेअर अकॅडमीला मान्यवरांची सदिच्छा भेट




नांदेड/प्रतिनिधी-जी.डी. गोएंका हेल्थकेअर अकॅडमीला सोमवार, दि.२८ सप्टेंबर रोजी समाजातील मान्यवरांनी सदिच्छा भेट देऊन अकॅडमीची पाहणी केली. यावेळी स.महेंद्रसिंघ लांगरी, स.गुरमितसिंघ महाजन, स.तेजपालसिंघ खेड आणि स. लक्कीसिंघ रामगडिया यांनी अकॅडमीच्या विविध उपक्रमांची माहिती जाणून घेत व्यवस्थापनाचे कौतुक करून प्रोत्साहन दिले.

यावेळी स.तेजपालसिंघ खेड यांनी सध्याच्या काळात समाजातील युवक-युवतींसाठी तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांची गरज अधोरेखित केली. अशा अभ्यासक्रमांच्या माध्यमातून युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात. तसेच वैद्यकीय क्षेत्रात प्रशिक्षित व कुशल पॅरामेडिकल मनुष्यबळाची असलेली गरज पूर्ण करण्यासाठी अशा संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. नांदेड सारख्या शहरात जी. डी. गोएंका हेल्थकेअर अकॅडमीच्या माध्यमातून दर्जेदार प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, युवक-युवतींना कौशल्याधारित शिक्षणासोबत रोजगाराच्या संधी मिळण्यास मदत होणार आहे. नवीन पिढीने या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. भेटी दरम्यान मान्यवरांचा अकॅडमीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. सचिन सिंघल, विक्रांत कांबळे, अर्शद पठाण, रुपाली कोत्तावार, जसपालसिंघ कोल्हापुरे यांच्यासह अकॅडमीचे शिक्षकवृंद उपस्थित होते.

# प्लास्टिकमुक्तीसाठी कंधारच्या विद्यार्थ्यांचा पुढाकार

कंधार/प्रतिनिधी-सेवा संकल्प अभियानांतर्गत नगरेश्वर प्राथमिक शाळा, कँधार येथे प्लास्टिकमुक्ती जनजागृती मोहीम तसेच विविध पर्यावरणपूरक उपक्रम उत्साहात राबविण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी कापडी पिशव्या तयार करणे, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ व उपयोगी वस्तू तयार करणे आदी उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. टाकाऊ वस्तूंचा पुनर्वापर करून आकर्षक व उपयुक्त वस्तू तयार करण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध वस्तू, कापडी पिशव्या तसेच टाकाऊ वस्तूंपासून तयार केलेल्या कलाकृतींचे प्रदर्शन यावेळी भरविण्यात आले. प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता प्लास्टिक टाळा, कापडी पिशवी वापरा असा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक बसवेश्वर मंगनाळे यांनी मार्गदर्शन केले.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर,नांदेड यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१४५५/२०२६

अर्जदार : १. माधव पि.रामराव मोरे वय ४८ वर्ष व्यवसाय शेती रा.घर क्र.१७२, विठल निवास, विजय नगर नांदेड हाउसींग सोसायटी नांदेड, २. प्रेमला भ्र.संभाजी पावडे वय ५५ वर्षे धंदा घरकाम रा.पावडेवाडी बु.ता.जि.नांदेड, ३. सुनिता पि.पंडीत पतंगे वय ५० वर्ष धंदा घरकाम रा.कुर्तडी ता.कळमनुरी जि.हिंगोली, ४. आशा भ्र. प्रभाकर कदम वय ३८ वर्ष धंदा घरकाम रा.लोळेश्वर ता.बसमतनगर जि.हिंगोली, ५. उषा भ्र.सुनिल भोसले वय ३८ वर्ष धंदा घरकाम रा. सुगाव खु.पो.वाघी ता.जि.नांदेड

विरुध्द

निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत एस.रुक्मीणबाई भ्र.रामराव मोरे यांचे वारस आहेत. मयत एस.रुक्मीणबाई भ्र.रामराव मोरे यांचा मृत्यू दिनांक ०८/१२/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ०६/११/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
४ थे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

CHANGE IN NAME

My (old name) is **RONAK BAHETI** which now I am, changing as (new name) **RONAK SANJAY BAHETI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**RONAK SANJAY BAHETI**
R/o 2-12-443, Flat no.4 Banda ghat road
Ashwini appartment Vazriabad Nanded-431601
Mob. No.7385172350

CHANGE IN NAME

My (old name) is **SAYYED JAVED S RAMJAN** which now I am, changing as (new name) **SYED JAVED SYED RAMZAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SYED JAVED SYED RAMZAN**
R/o plot no.8, B and C colony behind
Anjum bekary and Coldrinks, Taroda bk
Nanded-431605
Mob. No.9860524746

# व्ही.पी.के.ॲग्रो गूळ पावडर कारखान्याचा गाळप हंगाम सुरु



उमरी/प्रतिनिधी-प्रयागनगर सिंधी, ता.उमरी येथील व्ही.पी.के.ॲग्रो गूळ पावडर कारखान्याचा गाळप हंगाम उत्साहात सुरू करण्यात आला. यावेळी कारखान्याच्या नवीन गूळ पावडर बॅगचे पूजन कारखान्याचे सीईओ तथा युवा नेते संदीप पाटील कवळे यांच्या हस्ते करण्यात आले.

गूळ पावडर उत्पादनाच्या नव्या हंगामाला प्रारंभ झाल्याने कारखाना परिसरात उत्साहाचे वातावरण होते. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक तथा माजी सरपंच प्रभाकर पाटील पुयड, सिंधी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन लिंग्राम पाटील कवळे यांच्यासह कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी व कामगार बांधव उपस्थित होते. गाळप हंगामाच्या प्रारंभानिमित्त नवीन गूळ पावडर बॅगचे पूजन करून उत्पादन प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. कारखान्याच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी उपस्थित राहून हंगामाच्या प्रारंभात सहभाग नोंदविला.

CHANGE IN NAME

My (old name) is **SHAHNAJBEGUM** which now I am, changing as (new name) **SAINASBIBI SYED RAMZAN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SAINASBIBI SYED RAMZAN**
R/o plot no.8, B and C colony behind
Anjum bekary and Coldrinks, Taroda bk
Nanded-431605
Mob. No.9860524746

CHANGE IN NAME

My (old name) is **KAVITA BAHETI** which now I am, changing as (new name) **INDIRA SANJAY BAHETI**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**INDIRA SANJAY BAHETI**
R/o 2-12-443, Flat no.4 Banda ghat road
Ashwini appartment Vazriabad Nanded-431601
Mob. No.7385172350

# सुनहरी यादें'संगीत कार्यक्रमाचे २ ऑक्टोबर रोजी आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-हिंदी चित्रपट सृष्टीच्या सुवर्णकाळातील अजरामर आणि लोकप्रिय गीतांच्या सुरेल आठवणींना उजाळा देणाऱ्या 'बेमिसाल नगमों की, सुनहरी यादें-सीझन ४' या विशेष संगीत मैफलीचे आयोजन स्वर उत्सव फिल्म संगीत प्रतिष्ठान, नांदेड यांच्या वतीने महात्मा गांधी जयंती दिनी शुक्रवार २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता कुसुम सभागृह येथे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन आ.बालाजी कल्याणकर यांच्या हस्ते होणार आहे. गीतांशी जोडलेल्या जुन्या आठवणी यांचा सुरेल मिलाफ या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. रसिकांना प्रवेश विनामूल्य आहे. कार्यक्रमाचे निर्मिती इंजि.गणेशसिंह चंदेल यांची असून निवेदक तथा गायक प्रदीप सोनटक्के यांची अभिनव संकल्पना आणि दिग्दर्शन लाभले आहे.

# महामार्गाच्या रखडलेल्या कामांविरोधात १ ऑक्टोबर रोजी माहूर बंदचे आवाहन



माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूरगड परिसरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील अनेक महत्त्वाची कामे गेल्या अनेक वर्षापासून रखडलेली असतानाही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने माहूरकरांचा संताप आता उफाळून आला आहे. दि.१ ऑक्टोबर रोजी माहूर बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

रखडलेल्या महामार्गाच्या कामांना तातडीने गती देऊन ती पूर्ण करण्याच्या मागणीसाठी पत्रकार अपील बेलखोडे आणि राज ठाकूर यांनी २८ सप्टेंबरपासून दत्त चौक, टी-पॉईंट येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. मात्र उपोषणाच्या तिसऱ्या दिवसापर्यंतही प्रशासनाकडून मागण्यांची ठोस दखल घेण्यात न आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वर्षानुवर्षे रखडलेल्या कामासाठी नागरिकांकडून सातत्याने पाठपुरावा, निवेदने आणि मागण्या करूनही परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला नाही. त्यामुळे आता माहूरकरांनी प्रशासनाविरोधात थेट आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. माहूर शहरातील नागरिक व पत्रकारांच्या वतीने गुरुवार, दि. १ ऑक्टोबर रोजी माहूर बंदची हाक देण्यात आली असून सकाळी १० वाजता दत्त चौक, टी-पॉईंट येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनासंदर्भात माहूर पोलिस ठाण्यात लेखी निवेदन देण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्गावरील रखडलेली कामे तातडीने पूर्ण करून माहूरच्या विकासाला गती द्यावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. माहूर हे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक येथे येतात; मात्र अपूर्ण आणि रखडलेल्या महामार्गाच्या कामांमुळे स्थानिक नागरिकांसह भाविकांनाही अनेक अडचणींना सामना करावा लागत असल्याची नाराजी आहे. त्यामुळे आता केवळ आश्वासने नकोत, तर रखडलेल्या कामांना प्रत्यक्ष सुरुवात करून त्यांना निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावे, अशी माहूरकरांची ठाम भूमिका आहे. प्रशासनाने उपोषणकर्त्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन ठोस निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. १ ऑक्टोबरच्या बंद आणि रास्ता रोको आंदोलनात माहूरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन गेल्या अनेक वर्षापासून रखडलेल्या विकासकामांकडे प्रशासनाचे लक्ष वेधावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सचिन वाझेंच्या जामिनाला एनआयएचे आव्हान

मुंबई/प्रतिनिधी-अँटिलियाबाहेर स्फोटके ठेवणे आणि व्यावसायिक मनसुख हिरेन हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी माजी पोलीस अधिकारी सचिन वाझे याला विशेष एनआयए न्यायालयाने मंजूर केलेल्या जामिनाला राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. एनआयएने याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली. मात्र, न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी ही मागणी मान्य केली नाही. त्यामुळे ३० सप्टेंबर रोजी न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होण्याची शक्यता आहे. विशेष एनआयए न्यायालयाने वाझेला जामीन देताना तपास यंत्रणेच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित केले होते. अंबानी कुटुंबाच्या मनात भीती निर्माण करण्याच्या उद्देशाने स्फोटके ठेवण्यात आली होती, हे सिद्ध करणारा पुरेसा पुरावा किंवा साक्षीदाराची साक्ष उपलब्ध नसल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. तसेच घटनेला पाच ते सहा वर्षे उलटूनही अंबानी कुटुंबातील सदस्यांचे जबाब नोंदविले नसल्याबद्दलही न्यायालयाने तपास यंत्रणेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

# विद्यार्थ्यांच्या ताटात पोषण आहार; स्वयंपाक्यांच्या ताटात मात्र उपासमारीचे संकट

माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यातील शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन तयार करणाऱ्या स्वयंपाकींचे एप्रिल २०२६ पासूनचे मानधन अद्याप रखडले आहे. शाळा सुरू झाल्यापासून जून महिन्यापासून नियमितपणे पोषण आहार तयार करून देणाऱ्या स्वयंपाक्यांनाही अद्याप मानधन मिळाले नसल्याने त्यांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. रखडलेले मानधन तातडीने अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने गटशिक्षण अधिकारी संतोष शेटकर यांची भेट घेऊन केली.

विद्यार्थ्यांच्या ताटात दररोज पोषण आहार पोहोचविण्यासाठी स्वयंपाकी पहाटेपासून शाळेच्या कामात व्यस्त असतात. मात्र, विद्यार्थ्यांना आहार देणाऱ्या या हातांनाच गेल्या अनेक महिन्यांपासून मोबदल्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या स्वयंपाक्यांसाठी हे उत्पन्न कुटुंबाच्या दैनंदिन गरजा भागविण्याचे महत्त्वाचे साधन आहे. मात्र, एप्रिलपासून मानधन रखडल्याने काम सुरू, मोबदला बंद अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.पोषण आहार तयार करण्यासाठी दररोज ठराविक वेळ देणे बंधनकारक असल्याने स्वयंपाक्यांना अन्य ठिकाणी काम करून अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची संधीही मर्यादित होते. त्यातच अनेक महिन्यांचे मानधन प्रलंबित असल्याने सणासुदीच्या काळात घरखर्च, मुलांचे शिक्षण आणि दैनंदिन गरजा भागविताना या कुटुंबांची मोठी आर्थिक कोंडी होत आहे.विद्यार्थ्यांच्या आरोग्य व पोषणासाठी महत्त्वाची असलेल्या प्रधानमंत्री पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या स्वयंपाक्यांचे मानधन वेळेत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शासन व संबंधित विभागाने प्रलंबित मानधनाचा तातडीने निपटारा करून स्वयंपाक्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे माहूर तालुकाध्यक्ष रा. च. चारोळे यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत कुंडलवाडीची कु.अक्षरा निलपवार प्रथम

कुंडलवाडी/प्रतिनिधी-जिल्हा क्रीडा संकुल, नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत के. रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडीच्या विद्यार्थिनीने ६५ किलो वजन गटात कु. अक्षरा शंकर निलपवार हिने दमदार कामगिरी करत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.

विशेष म्हणजे, अक्षराने सलग दुसऱ्यांदा जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. अक्षराच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी भर पडली असून, तिच्या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्कूरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कूरवार, प्राचार्य संभाजी जाधव व उप प्राचार्य सपना म्हैसेवाड यांनी अक्षराचे अभिनंदन केले. तसेच तिचे मार्गदर्शक क्रीडा शिक्षक रमेश कासलोड, अर्चना नरोड तसेच सहशिक्षक कामाजी तुकडेकर यांचेही अभिनंदन करण्यात आले. विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी अक्षराला सर्वांनी शुभेच्छा दिल्या असून, आगामी स्पर्धेतही ती उत्तम कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.



# देगलूर नगर पालिकेचा कर माफ करण्याची युवक काँग्रेसची मागणी

देगलूर/प्रतिनिधी-यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे देगलूर शहरातील नागरिकांची आर्थिक स्थिती बिकट झाली असून, आर्थिक वर्षासाठी आकारण्यात येणारा मालमत्ता कर व पाणीपट्टी कर माफ करावा, अशी मागणी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास नरबागे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन नागरिकांना आर्थिक दिलासा देण्याची मागणी केली.

देगलूर शहरातील अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती व शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेती उत्पादनात मोठी घट झाली आहे. परिणामी शेतकरी, शेतमजूर तसेच रोजंदारीवर काम करणाऱ्या नागरिकांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. अनेक कुटुंबांसमोर दैनंदिन खर्च भागविण्याचे आव्हान निर्माण झाले असताना नगरपालिकेकडून मालमत्ता कर व पाणीपट्टी कराची वसुली सुरू आहे.दुष्काळामुळे उत्पन्नाचे स्रोत मर्यादित झाले असताना नागरिकांवर कराचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी नगरपालिकेने २०२६-२७ या वर्षातील मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर माफ करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.दुष्काळी परिस्थितीचा विचार करून शेतकरी, शेतमजूर आणि हातावर पोट असलेल्या कुटुंबांना आर्थिक दिलासा देणे आवश्यक आहे.

# पो.नि.गणेश कराड यांची बदली रद्द करण्याची मागणी

## किनवटच्या नागरिकांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

किनवट/प्रतिनिधी-किनवट पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांची अचानक आणि विनाचौकशी केलेली बदली रद्द करून, त्यांना पुन्हा किनवट पोलीस स्टेशन येथे प्रभारी अधिकारी म्हणून तत्काळ नियुक्त करण्यात यावे, या मागणीसाठी किनवट शहरातील विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वधर्मीय जागरूक नागरिकांनी पोलीस अधीक्षक, नांदेड येथे निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, पो.नि.कराड यांनी आपल्या अल्प कालावधीच्या कार्यकाळात शहर व परिसरातील गुंडगिरी, अवैध धंदे, मुलींची छेडछाड करणाऱ्या टवाळखोरांचा आणि चोऱ्या करणाऱ्या पाकीटमारांचा कौशल्याने बंदोबस्त केला होता. पोलीस ठाण्यात मनुष्यबळ निम्मे असतानाही त्यांनी अहोरात्र सेवा बजावत परिसरामध्ये शांतता व सुरक्षेचे वातावरण निर्माण केले होते. मात्र, चांगल्या अधिकाऱ्याची अचानक बदली करण्यात आल्याने किनवट परिसरातील शांतताप्रेमी व जागरूक नागरिकांमध्ये प्रचंड संभ्रम आणि असंतोष पसरला आहे. पोलीस निरीक्षक कराड यांची बदली झाल्यापासून परिसरात पुन्हा अवैध धंदे फोफावले असून गुंडांनी डोके वर काढले आहे. सध्या रुजू झालेले अधिकारी मंडलवार यांची कामगिरी अत्यंत असमाधान-कारक असून, पोलीस ठाण्याचे स्वरूप एखाद्या जत्रेसारखे झाले आहे, असा गंभीर आरोपही या निवेदनातून करण्यात आला आहे. लोकशाही आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कायम ठेवण्यासाठी पोलीस निरीक्षक कराड यांची बदली रद्द करून त्यांना पुन्हा परत किनवट येथे पाठवण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. संबंधित वरिष्ठांकडे पाठवण्यात आलेल्या निवेदनावर माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, गोविंदराव किष्ट्वा सिरमनवार, शेख जाफर शेख अमनउल्ला, शेख शादुल्ला शेख आहेमद, सतीश हनमलू नेमानिवार, प्रा. डॉ. किरण व्यंकटराव आयनेनीवार, संतोष नारायणराव दासरवार, म.अय्युब म.याकुब, जयपाल जाधव, व्यंकट मेडपेल्लीवार, प्रभाकर नरसिमलू सुंकरवार, नगरसेवक श्रीनिवास नेम्मानिवार, ॲड. माज बख्तुज, नगरसेविका सौ. निलोफर निसार भाटी, नगरसेविका सौ.अश्विनी आदर्श जागरलावार, अब्दुल खालेद अब्दुल शफी आणि इस्माईल शेख यांच्यासह किनवट शहरातील सर्व जागरूक व शांतताप्रेमी नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# तरुणाईने व्यसनांपासून दूर राहून सशक्त बनावे-डॉ.संजय कदम

नांदेड/प्रतिनिधी-बदलत्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर तरुणांनी शारीरिक आरोग्यासोबत मानसिकदृष्ट्याही सशक्त बनावे आणि व्यसनांपासून दूर राहावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेचे अध्यक्ष डॉ. संजय कदम यांनी केले.

पीपल्स कॉलेजच्या लोकप्रशासन विभागाच्या वतीने तरुण आणि बदलती जीवनशैली या विषयावर पीपल्स कॉलेज कट्ट्यावर आयोजित विद्वत व्याख्यानात ते बोलत होते. सोशल मीडिया व मोबाईलचा अतिरिक्त वापर मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे स्क्रीन टाईम मर्यादित ठेवून पुस्तकांशी मैत्री करावी, असा सल्ला डॉ. कदम यांनी दिला. अमली पदार्थ, मद्यपान व अन्य व्यसनांपासून दूर राहून आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहनही त्यांनी केले.आजच्या तरुणांमध्ये अपयश स्वीकारण्याची क्षमता कमी होत असल्याचे सांगत मानसिक कणखरता, संयम आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बदलती जीवनशैली, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि सोशल मीडियाचा प्रभाव याबाबत तरुणांनी गांभीर्याने विचार करावा,



असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकप्रशासन विभागप्रमुख डॉ. बाजीराव वडवळे यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी निसर्गाशी नाते जोडून नैसर्गिक दिनचर्या, संतुलित आहार, व्यायाम, पुरेशी झोप आणि सकारात्मक विचारसरणीचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास एन.ई.एस.चे कार्यकारिणी सदस्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. यशपाल भिंगे, सिनेट सदस्य तथा इंग्रजी विभागातील डॉ. डी.एन. मोरे, डॉ. अमोल काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रा. कल्पना जाधव, प्रा. विजय कदम, डॉ. विनायक देव, डॉ. पूनम लोहाना, डॉ. आम्रपाली कसबे, डॉ. माया भालेराव, प्रा. जी. डी. ताडोड, प्रा. व्यंकट जाधव, प्रा. संतोष गिरी, डॉ. संध्या जाधव, प्रा. पद्मजा पोले यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्पणा गाजुलवार यांनी केले, तर डॉ. अमोल काळे यांनी आभार मानले. व्यसनमुक्ती, मानसिक सक्षमता, आरोग्यदायी जीवनशैली आणि सोशल मीडियाच्या विवेकी वापराबाबत मार्गदर्शन करणारे हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरले.

पान १ वरून

## निवडणूक आयोगाविरोधात...

पेपरवर घेण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.दरम्यान, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात इंडिया आघाडीने आंदोलनाची घोषणा केल्याने येत्या काळात हा मुद्दा राजकीयदृष्ट्या अधिक चर्चेत येण्याची शक्यता आहे.६ ऑक्टोबरचा खासदारांचा मोर्चा आणि १ नोव्हेंबरचा दिल्लीतील विराट मोर्चा याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## कृषी विभागातील कथित...

मागितलेली माहिती वेळेत उपलब्ध करून द्यावी आणि न्यायालयीन आदेशांची तत्काळ अंमलबजावणी करावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.कृषी विभागातील मजुरांच्या नियुक्त्या व ज्येष्ठता यादी तयार करताना नियमांचे पालन झाले आहे का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही संघटनेने केली आहे. दरम्यान, आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधून मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार असून, मागण्यांची दखल न घेतल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. या आंदोलनाचे नेतृत्व ज्येष्ठ नेते साथी बळवंत मोरे यांनी केले तर भाकप व आयटकच्या वतीने कॉ.प्रदीप नागापूरकर, जनता दलाच्यावतीने डॉ.किरण चिद्रावार, उस्मानशाही मिल संघर्ष समितीच्यावतीने श्याम निलंगेकर, तरन्नुम मोहमद आदींनी पाठिंबा दिला. तर या आंदोलनात संजय भुमावार, शेख अब्दुल, सायबु लंके, व्यंकट इंझळे, पिराजी वडजे, गंगाधर माशनवार, यांच्यासह स्त्री-पुरुष कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## राज्यात सरसकट कोरडा...

प्रदेश अध्यक्ष कॉ.मानेजी पाटील चोखाळेकर, पी.डी.वासमवार, दत्ता हरी जगदंबे, ज्ञानेश्वर नवले, चंदु झुंजारे, रावसाहेब बलके, विकास अंधुरे, सतीश जाधव, संदीप जाधव, रामेश्वर घायाळे, राजू राठोड यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते. या आंदोलनाला भाकप व आयटकच्या वतीने कॉ.प्रदीप नागापूरकर, जनता दलाच्यावतीने डॉ.किरण चिद्रावार यांनी पाठिंबा दिला.

# देगलूरमध्ये मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर शहरातील ईदगाह परिसरातील पाण्याच्या टाकी जवळ सुरु असलेल्या मटका अड्डयावर पोलीसांनी धाड टाकुन तीन जणांना अटक केली आहे.

ईदगाह परिसरातील पाण्याच्या टाकीजवळ मटका अड्डा सुरु असल्याची माहिती देगलूर पोलीसांना मिळाली. फौजदार मैसनवाड, फौजदार किरण बेबडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून श्रीदेवी व टाईम बाजार नावाचा मटका घेत असतांना माधव तलवारे, तिरुपती तलवारे रा.आचेगाव व सुशील बोडके रा.बोरगाव या तीघांना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम व मटका घेण्याचे साहित्य पोलीसांनी जप्त केले आहे.

# मंडल विरुद्ध मनुवादचे ४ ऑक्टोबरला मुंबई येथे प्रकाशन

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाच्या वतीने रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता टिळक भवन, दादर, मुंबई येथे मंडल विरुद्ध मनुवाद या पुस्तकाचे प्रकाशन तसेच ओबीसी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. यशपाल भिंगे यांनी लिहिलेल्या मंडल विरुद्ध मनुवाद या पुस्तकात सामाजिक न्याय, संविधान, प्रतिनिधित्व आणि ओबीसींच्या हक्कांच्या संदर्भातील वैचारिक मांडणी करण्यात आली आहे. या पुस्तकाचे प्रकाशन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ राहणार आहेत. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री अमित देशमुख आणि माजी प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा नानोरकर हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच महाराष्ट्राचे नवनियुक्त महाराष्ट्र प्रभारी डॉ. सिरिवेला प्रसाद यांची विशेष उपस्थिती राहणार आहे

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रज्जाक यांच्या सिमा प्रिंटिंग अँण्ड लिथो प्रिंटिंग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४